

https://www.facebook.com/photo.php?fbid=937373603046297&set=a.295403477243316.71127.100003209970450&type=3&theater

## १४ वर्षांचा 'वन'वास आणि सजगतेचं epidemic.. – २ मे २०१६

१४ वर्षांपूर्वी ऑयकॉसची स्थापना केली.
निसर्गासाठी पूर्ण वेळ काम करायचं म्हणून.
किंबहुना स्वतःच्या स्वार्थापोटी देखील.
स्वार्थ काय होता तर स्वतःची आवड जोपासण्याचा.
आवड कसली तर जंगलात भटकण्याची.
झाडा-प्राण्यांची ओळख माणसाला करून देण्याची.
त्यांची किचकट शास्त्रीय नाव शोधायची.
जमिनीचे सुंदर सुंदर चित्ररुपी आराखडे रेखाटायची.
जमीन मालकांना ते स्वाधीन केल्यावर त्यांचा प्रफुल्लीत चेहरा बघायची.
त्यांच्याशी तासन तास बौद्धिक चर्चा करण्याची.


**oikos**, 210, Siddharth Towers, Survey no 12/3B, Kothrud, Pune - 411029
Ph. No.: 020 25451875, E mail: oikos@oikos.in

वेळ प्रसंगी त्यांना गोष्टी सांगण्याची..
माणसांच्या, प्राण्यांच्या, माणसांनी राखलेल्या निसर्गाच्या...
त्यातून त्यांना मिळणाऱ्या समाधान, साक्षात्काराला साक्षी असण्याची.
पुढे जाऊन त्या जमिनीवर निसर्ग कसा फुलतो हे बघण्याची.
राहिलेल्या त्रुटीमधून शिकण्याची...
अधिकाधिक समृद्धतेकडे जाण्याची..

गेली १४ वर्ष आम्ही या वनवासाचा पुरेपूर उपभोग घेत आलो.

परवा एकानं विचारल की काय साधल एवढ्या काळात ?
याकरता सांख्यिक उत्तरं देता येतीलच..कदाचित फार उत्तम नाही पण जरा बरा आकडा समोरही येईल.. पण हे सगळच समस्यांच्या मानानी तसं किरकोळ. आणि तसंही जमीन पूर्णतः राखून केवळ तिथे निसर्ग पुनरुज्जीवन ध्येय ठेवणारी आमची गिऱ्हाईक हाताच्या बोटावर मोजण्या इतकी.
त्यामुळे हा प्रयत्न फार मोठ्या प्रमाणावर चालला आहे असं नाही.
पण गिऱ्हाईकाला आणि आम्हाला आनंद देणारा आहे.
आणि त्यात फायदा निसर्गाचा आहे. केंद्रस्थानी निसर्ग आहे.
वैयक्तिक फायद्याचा मुद्दाच इथे नसल्यानी हे उत्तम चालू आहे.
या निमित्तानी पुनरुज्जीवनाची काही प्रारुपं बनताहेत.

उरलेली बोटं काय करतात हे देखील बघायला हरकत नाही.
त्यांना आम्ही मदत करतो हे निसर्ग राखण्याच वेड त्यांच्या विकासाच्या आराखड्यात मिसळायला.
काही ‘व्यावहारिक’ कारणांमुळे त्यांना विकासाचा सरधोपट मार्ग घ्यावाच लागतो म्हणे. त्यात काही एक प्रमाणात बदल करून वीसेक टक्के जमिनीवर प्रत्यक्ष निसर्ग फुलवण्याच काम आणि उरलेल्या जमिनीवरच्या ‘विकासा’चा एकूणच पर्यावरणीय ठसा (Ecological footprint मग त्यात उर्जा, जीव विविधता, माती, पाणी वगैरे सगळं आलंच) कसा कमीत कमी ठेवता येईल याकरता सल्ला. दुसरा भाग प्रत्यक्ष उतरवण्यात गिऱ्हाईक सोयीच शास्त्र वापरतात पण निसर्गाला जराशी परतफेड केली एवढच काय ते समाधान.

गिऱ्हाईकांची तिसरी श्रेणी अशीही असते की त्यांना प्रमाणपत्रांकरता (NOC) निसर्ग राखायचा असतो. खर तर आतून खर्र खर्र राखायचा असतो पण परत एकदा bottom line खाली आपण दाबले गेलो असल्यानी फार ‘इलाज’ राहत नाही. अत्यंत ‘नैसर्गिक’रित्या प्रमाणपत्रांकरता दिलेले कबुली जबाब आपण विसरतो. हे इतकं ‘स्वाभाविक’ आहे की दोष कुणाला देणार ?

या सगळ्यातून एक समान गोष्ट नक्की साधली जाते असं आता जाणवत –
ती म्हणजे माणूस बदलण्याची.
काय आहे हा बदल ?


**oikos**, 210, Siddharth Towers, Survey no 12/3B, Kothrud, Pune - 411029
Ph. No.: 020 25451875, E mail: oikos@oikos.in

तर दृष्टिकोनातला..
निसर्गाकडे बघण्याचा. परिसराकडे, स्वतःकडे बघण्याचा. आपण आपला परिसर, परिसरातील वस्तू वापरतो कशा हे उघड्या डोळ्यांनी बघण्याचा... त्यात सजगता येण्याचा.

ही ‘सजगता’ माणसा माणसानुसार बदलते..
कोणी ती पूर्ण आत्मसात करतं.. कोणी ८० %.. कोणी २० % !
ही सजगता epidemic आहे.. संसर्गजन्य आहे असं जाणवतं.
हे हळू हळू पसरणार हे नक्की !!


**oikos**, 210, Siddharth Towers, Survey no 12/3B, Kothrud, Pune - 411029
Ph. No.: 020 25451875, E mail: oikos@oikos.in